# देव ख्रिस्ती मंडळयांना देखरेख ठेवणारे देतो



**अनुक्रमाणिका**


परिचय

अनुक्रम

परिचय

कथावृत्तांत्त

देखरेख ठेवणायांसंबंधात पवित्र शास्त्र काय सांगते

1. प्राचीन इस्राएलमध्ये

2. शुभवर्तमानांमध्ये

3. यरुशलेमेमधील मंडळीत

4. परराष्ट्रीयांच्या मंडळीत

5. मंडळयांना लिहिलेली पत्रे

6. पाळकांना पाठवलेली पत्रे

7. ख्रिस्ती लोकांना पाठवलेली पत्रे

व्यावहारिक सल्ला

देखरेख ठेवणायाला असणारे धोके

कथावृत्तांत्त पुढे सुरु

प्रात्यक्षिक कार्य

अनुमान


## परिचय

तुमच्या मंडळीतील किंवा गटातील येशूच्या अनुयांयांची देखरेख करण्यसाठी पवित्र आत्म्याला तुम्हांला शिकवण्याची विनंती करा.

## कथावृत्तांत्त

श्री. प्रशिक्षक श्री. विश्वासणूयाला विचारतात, ''कोणी नवजात बालकाला त्याची आपोआप वाढ व्हावी म्हणून शेतात ठेवून देईल का?''

श्री. विश्वासणारे हसतात आणि उत्तर देतात, ''नाही अजिबात नाही, त्याचे आई-वडील त्या बाळाला घरी आणतील आणि त्याचे नीट संगोपन करतील.''

श्री. प्रशिक्षक श्री. विश्वासणूयाला विचारतात,''कोणता मेंढपाळ आपली मेंढरे वूायावर सोडून देईल का?''

श्री. विश्वासणारे पुन्हा हसतात आणि उत्तर देतात, ''नाही, चांगला मेंढपाळ आपल्या मेंढरांचे मार्गदर्शन करतो आणि लांडग्या यांपासून त्यांचे संरक्षण करतो. कळपाची वाढ होते तशी मेंढपाळ मेंढरांची देखभाल करण्यात मदत व्हावी म्हणून नवीन मेंढपाळांना शिकवून तयार करतात.''

श्री. प्रशिक्षक स्पष्ट करतात, ''आशाच प्रकारे, नवीन विश्वासणाऱ्यांची काळजी-देखभाल करण्यासाठी कोणाची तरी आवश्यकता असते. अशी काळजी घेणाऱ्यांना आपण 'देखरेख करणारे' असे म्हणतो. देखरेख करणाऱ्यांना पाळक, मेंढपाळ, वडीलजन आणि सेवक असेही म्हणतात.''

श्री. प्रशिक्षक आणखी पुढे सांगतात, ''तुमच्या गावातील काही लोकांनी येशूच्या मागे जाण्यास सुरुवात केली असेल, समजा मी तुम्हांला शिकवून तयार केले तर तुम्ही त्यांच्यावर देखरेख ठेवणारे होऊन त्यांना शिक्षण द्याल का तसेच त्यांचे संरक्षण कराल का?''

श्री. विश्वासणारे उत्तर देतात, ''नवीन अनुयायांना मदत करायला मला आवडेल, पण देखरेख करणारे कसे व्हायचे ते मात्र मला ठाऊक नाही. देखरेख करणाऱ्याने काय केले पाहिजे?''

श्री. प्रशिक्षक सुचवतात, ''देखरेख करणाऱ्यांसंबंधी आपण पवित्र शास्त्रातून वाचू या.''

## देखरेख ठेवणाऱ्यांसंबंधात पवित्र शास्त्र काय सांगते

### 1. प्राचीन इस्राएलमध्ये

खूप वर्षांपूर्वी, सार्वकालिक देवाने इस्राएल लोकांना इजिप्तमधून बाहेर पडण्यास मदत केली, तेव्हा मोशे हाच त्यांचा एकमेव नेता होता. दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यन्त तो लोकांच्या प्रश्नांची उत्तरे देत असे आणि त्यांचे भांडण तंटे सोडवत असे. हे सर्व करतांना तो अगदी थकून जात असे आणि सर्वांनाच मदत करणे त्याला अशक्य होऊन बसे मग लोक तक्रारी करीत असत.

एकदा मोशेचा सासरा त्याला भेटण्यास आला तेव्हा मोशे कामात किती गढून गेला आहे, हे त्याने पाहिले आणि त्याला पुढील सल्ला दिला :

> ''तर आता माझे ऐक, मी तुला सल्ला देतो आणि देव तुझ्याबरोबर असो, ह्या लोकांचा देवापाशी तू मध्यस्थ हो आणि ह्यांची प्रकरणे देवापाशी ने, विधी व नियम त्यांना शिकीव आणि त्यांनी कोणत्या मार्गाने चालावे व कोणते काम करावे हे त्यांना दाखवीत जा. तसेच तू ह्या सर्व लोकातून कर्तबगार, देवाचे भय धरणारे, विश्वासू, लाचलुचपतीचा द्वेष करणारे असे पुरुष निवडून घे आणि लोकांवर अधिकार चालविण्यासाठी त्यांना हजार हजार, शंभर शंभर, पन्नास पन्नास, दहा दहा जणांवर नायक म्हणून नेमून ठेव, त्यांनी प्रत्येक वेळी लोकांचा न्यायानिवाडा करावा, त्यांनी सर्व मोठी प्रकरणे तुझ्याकडे आणावी आणि लहान सहान प्रकरणांचा त्यांनीच निकाल करावा. अशाने तुझे काम हलके होईल व ते तुझ्या भाराचे वांटेकरी होतील. तू असे करिशील व देव तुला तसा हुकूम करील तर तुझा टिकाव लागेल आणि हे सर्व लोक आपल्या ठिकाणी सुखाने जातील,'' मोशेने आपल्या सासऱ्याचे ऐकून त्याच्या सांगण्याप्रमाणे सर्व काही केले. (निर्गम 18:19-24)

**कृपा करुन पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.**

- देखरेख करणारा असणे महत्वाचे का आहे?
- कोणते पुरुष देखरेख करण्याचे काम करणारे होऊ शकतील?
- कोणत्या विविध आकाराच्या गटांना देखरेख करणाऱ्याची गरज आहे?

### 2. शुभवर्तमानांमध्ये

आपल्या अनुयायांना त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या, त्यांना शिकवणाऱ्या आणि त्यांचे पुढारीपण करणाऱ्या लोकांची गरज आहे हे येशूला ठाऊक होते. त्याने शिकवले की तो स्वत: त्याच्या कळपाचा उत्तम मेंढपाळ आहे. त्याने म्हटले,

मी उत्तम मेंढपाळ आहे, जसा पिता मला ओळखतो व मी पित्याला ओळखतो, तसे जे माझे आहेत त्यांना मी ओळखतो व जे माझे आहेत ते मला ओळखतात आणि मेंढरांसाठी मी आपला प्राण देतो. ह्या मेंढवाडयातली नव्हेत अशी माझी दुसरी मेंढरे आहेत, तीही मला आणली पाहिजेत, ती माझी वाणी ऐकतील, मग एक कळप, एक मेंढपाळ असे होईल. मी आपला प्राण परत घेण्याकरीता देतो म्हणून पिता माझ्यावर प्रीती करितो (योहान 10:14-17)

येशू मरण पावला आणि पुन्हा जिवंत झाला त्यांनतर त्याने आपल्या काही अनुयायांना दर्शन दिले.

येशूने शिमोन पेत्राला म्हटले, ''योहानाच्या पुत्रा शिमोना, ह्यांच्यापेक्षा तू माझ्यावर अधिक प्रीती करितोस काय?'' तो त्याला म्हणाला, ''होय प्रभू, आपणावर मी प्रेम करितो, हे आपणाला ठाऊक आहे'' त्याने त्याला म्हटले, ''माझी कोकरे चार. ''पुन्हा दुसऱ्यांदा तो त्याला म्हणाला, ''योहानाच्या पुत्रा शिमोना, माझ्यावर प्रीती करितोस काय?'' तो त्याला म्हणाला, ''होय प्रभू, मी आपणावर प्रेम करितो हे आपणाला ठाऊक आहे'' त्याने त्याला म्हटले, ''माझी मेंढरे पाळ.'' तिसऱ्यांदा तो त्याला म्हणाला, ''योहानाच्या पुत्रा शिमोना, माझ्यावर प्रेम करितोस काय?'' माझ्यावर प्रेम करितोस काय असे तिसऱ्यांदा त्याला म्हटले, म्हणून पेत्र दु:खी होऊन त्याला म्हणाला,'' प्रभू आपणांला सर्व ठाऊक आहे, मी आपणावर प्रेम करितो हे आपण ओळखेले आहे.'' येशूने त्याला म्हटले, ''माझी मेंढरे चार.'' (योहाना 21:15-17).

पेत्राने येशूच्या अनुयायांना पत्र लिहून सांगितले :

तुम्हांतील वडिलांना, जो मी सोबतीचा वडील, ख्रिस्ताच्या दु:खांचा साक्षी व प्रगट होणाऱ्या गौरवाचा वाटेकरी तो मी असा बोध करितो. तुम्हामधील देवाच्या कळपाचे पालन करा,करावे लागते म्हणून नव्हे तर देवाच्या इच्छेप्रमाणे संतोषाने त्याची देखरेख. करा, द्रव्यालोभाने नव्हे तर उत्सुकतेने करा, तुमच्या हाती सोपविलेल्या लोकांवर धनीपण करणारे असे नव्हे तर कळपाला कित्ते व्हा, मग जेव्हा मुख्य मेंढपाळ प्रगट होईल तेव्हा तुम्हांस गौरवाचा न कोमेजणारा हार प्राप्त होईल. (1 पेत्र 5:1-4).

**कृपा करुन पुढील प्रश्नांची उत्तरे द्या :**

- देखरेख करणाऱ्याचे काम एखाद्या मेंढपाळासारखे कसे असते?
- देखरेख करणाऱ्याचे काही दृष्टीकोन सांगा.
- देखरेख करण्याची सेवा करणाऱ्याला देव कोणते प्रतिफळ देतो?

### 3. यरुशलेमेमधील मंडळीत

यरुशलेमेमधील मंडळीत प्रेषितांनी स्वत:च देखरेख सेवा केली. प्रे.कृ. 4 व 5.

प्रेषित मोठया सामर्थ्याने प्रभू येशूच्या पुनरुत्थानाविषयी साक्ष देत होते आणि त्या सर्वांवर मोठी कृपा होती. त्यांच्यातील कोणालाही उणे नव्हते, कारण जमिनीचे किंवा घरांचे जितके मालक होते तितके ती विकीत आणि विकलेल्या वस्तूंचे मोल आणून प्रेषितांच्या चरणांपाशी ठेवीत, मग ज्याच्या त्याच्या गरजेप्रमाणे प्रत्येकाला वाटून देण्यात येत असे (प्रे.कृ. 4:33-35)... ते तर त्या नावासाठी आपण अपमानास पात्र ठरविण्यात आलो म्हणून आनंद करीत न्यायसभेपुढून निघून गेले, आणि दररोज मंदिरात व घरोघर शिकविण्याचे व येशू हाच ख्रिस्त आहे ही सुवार्ता गाजविण्याचे त्यांनी सोडले नाही (प्रे.कृ. 5:41-42).

प्रेषितांनी नंतर मदतनीसांची नेमणूक केली आणि त्यांच्यावर विशेष कामगिरी सोपवून दिली.

तेव्हा बारा प्रेषितांनी शिष्यगणाला बोलावून म्हटले,''आम्ही देवाचे वचन सांगण्याचे सोडून पंक्तिसेवा करावी हे ठीक नाही, तर बंधुजनहो तुम्ही आपल्यामधून पवित्र आत्म्याने व ज्ञानाने पूर्ण असे सात प्रतिष्ठित पुरुष शोधून काढा. त्यांना आम्ही ह्या कामावर नेमू म्हणजे आम्ही स्वत: प्रार्थनेत व वचनाच्या सेवेत तत्पर राहू,'' ही गोष्ट सर्व लोकांना पसंत पडली (प्रे.कृ. 6:2-5)

यरुशलेमेतील प्रेषित व वडीलवर्गाने अवघड वाद ऐकून घेतले आणि त्यावर निर्णय दिला.

> तेव्हा पौल व बर्णबा ह्यांचा त्यांच्याशी बराच मतभेद व वादविवाद झाल्यावर असे ठरविण्यात आले की, पौल व बर्णबा ह्यांनी व त्यांच्यापैकी इतर काहीनी ह्या वादासंबंधाने यरुशलेमेत प्रेषित व वडीलवर्ग ह्यांच्याकडे जावे. मग मंडळीने त्यांची बोळवण केल्यावर... नंतर ते यरुशलेमेस पोहचल्यावर तेथील मंडळी, प्रेषित व वडीलवर्ग ह्यांनी आगतस्वागत केले. तेव्हा आपण देवाच्या सहवासात असताना त्याने जे जे घडविले ते त्यांनी सांगितले (प्रे.कृ. 15:2-4)

**कृपा करुन, पुढील प्रश्नाचे उत्तर द्या.**

- देखरेख करणारा कोणती कामे करतो?

## 4. परराष्ट्रीयांच्या मंडळीत

अंत्युखिया येथील मंडळीत सेवा करणाया संदेष्टे व शिक्षक ह्यांनी नव्या मंडळया सुरु करण्यासाठी प्रेषितांना पाठवले.

> अंत्युखियातील मंडळीत संदेष्टे व शिक्षक होते...ते प्रभूची सेवा व उपास करीत असता पवित्र आत्मा म्हणाला, ''बर्णबा व शौल ह्यांनी ज्या कार्यासाठी मी बोलाविले आहे त्यासाठी त्यांना माझ्याकरिता वेगळे करुन ठेवा,'' तेव्हा त्यांनी उपास व प्रार्थना करुन आणि त्यांच्यावर हात ठेवून त्यांची रवानगी केलीं (प्रे.कृ. 13:1-3)

पौलाने प्रत्येक मंडळीत वडीलांची नेमणूक केली आणि त्यांनी नवीन अनुयायी तयार केले.

> त्या नगरांत सुवार्ता सांगून त्यांनी पुष्कळ शिष्य केल्यावर...आणि शिष्यांची मने स्थिरावून त्यांनी त्यांना असा बोध केला की, विश्वासात टिकून राहा, ''कारण आपणाला पुष्कळ संकटांत टिकून देवाच्या राज्यात जावे लागते.'' त्यांनी त्यांच्यासाठी प्रत्येक मंडळीत वडील निवडले आणि उपास व प्रार्थना करुन ज्या प्रभूवर त्यांनी विश्वास ठेवला होता त्यांच्याकडे त्यांना सोपविले (प्रे.कृ. 14:21-23)

वडीलवर्गाने स्वत:वर तसेच मंडळीवर लक्ष ठेवायचे आणि त्यांची फसवणूक करणाया लांडग्यांपासून संरक्षण करायचे आहे.

> मग (पौलाने)... इफिसास निरोप पाठवून मंडळीच्या वडिलांना बोलावून घेतले. ते त्याच्याजवळ आल्यावर त्याने त्यांस म्हटले...तुम्ही स्वत:कडे व ज्याकळपात पवित्र आत्म्याने तुम्हांस अध्यक्ष करुन ठेवले त्या सर्वांकडे लक्ष द्या, ह्यासाठी की, देवाची जी मंडळी त्याने आपल्या रक्ताने स्वत:करिता मिळविली तिचे पालन तुम्ही करावे. मी गेल्यावर कळपाची दयामाया न करणारे क्रूर लांडगे तुम्हांमध्ये शिरतील, हे मी जाणून आहे. तुम्हांपैकीही काही माणसे उठून शिष्यांना आपल्यामागे ओढून विपरीत गोष्टी बोलतील. (प्रे.कृ. 20:17-18, 28-30).

**कृपाकरुन पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.**

- पौलाने देखरेख करणायांना कोणता इशारा दिला?
- देखरेख करणारे आणखी कोणकोणती कामे करतात?

## 5. मंडळयांना लिहिलेल्या पत्रांमध्ये

देवाचा आत्मा काही लोकांना मंडळयांमध्ये व गटांमध्ये देखरेख करण्याचे कृपादान देतो. रोम 12, 1 करिंथ 12, इफिस 4, फिलिप्पै 1.

> आपल्याला प्राप्त झालेल्या कृपादानांप्रमाणे आपल्याला निरनिराळी कृपादाने आहेत...पुढारी, तत्पर, आस्थेवाईक, संतुष्ट (रोम 12:6-8). तसे देवाने मंडळीत कित्येकांना नेमले आहे, प्रथम प्रेषित, दुसरे

> संदेष्टे, तिसरे शिक्षक शिवाय...असे नेमले आहे (1 करिंथ 12:28). त्यानेच कोणी प्रेषित, कोणी संदेष्टे, कोणी सुवार्तिक, कोणी पाळक व शिक्षक असे नेमून दिले, ते ह्यासाठी की, त्यांनी पवित्र जनांस सेवेच्या कार्याकरीता व ख्रिस्ताच्या शरीराची रचना पूर्णतेस नेण्याकरीता सिद्ध करावे (इफिस. 4:11).

स्थानिक ख्रिस्ती सहभागितेमध्ये दोन प्रकारचे सेवक असतात.

> फिलिप्पै येथील अध्यक्ष व सेवक ह्यांच्याबरोबर ख्रिस्त येशूच्या ठायी असणाया सर्व पवित्र जनांना. ..देव आपला पिता व प्रभू येशू ख्रिस्त ह्यांच्यापासून तुम्हांला कृपाा व शांती असो (फिलिप्पै 1:1-2).

ते ख्रिस्ती समाजाची सेवा करतात आणि त्याबदल्यात इतर त्यांचा आदर करतात.

> किंख्रियातील मंडळीची सेविका आमची बहीण फीबी हिची मी तुम्हांला शिफारस करितो, अशासाठी की, तुम्ही पवित्र जनांस योग्य असा तिचा प्रभूमध्ये स्वीकार करावा आणि ज्या ज्या कामात तिला तुमची गरज लागेल त्यात तिला साहाय्य करावे, कारण ती स्वत: पुष्कळ जणांस व मलाही साहाय्य करणारी अशी झाली आहे (रोम 16:1-2), बंधुजनहो, तुम्हांला स्तेफनाच्या घराण्याची माहिती आहे, ते अखयाचे प्रथमफळ आहे आणि त्यांनी आपणांस पवित्र जनांच्या सेवेला वाहून घेतले आहे. अशांना आणि जो कोणी सेवेत साहाय्य करितो व श्रम करितो त्याला तुम्ही मान्यता द्यावी अशी मी तुम्हांला विनंती करितो (1 करिंथ 16:15-16). एपफ्रास, आमच्या सेबतीचा प्रिय दास, तुमच्या वतीने ख्रिस्ताचा विश्वासू सेवक...(कलस्सै 1:7).

**कृपा करुन पुढील प्रश्नांची उत्तरे द्या :**

- देखरेख करणारे त्यांचे काम करण्यासाठी कार्यक्षम कसे होतात?
- कोणते विश्वासणारे चांगले देखरेख करणारे होताता हे अनुयायांना कसे ओळखता येते?

## 6. पाळकांना लिहिलेल्या पत्रांमध्ये

देखरेख करणारे देवाचे वचन शिकवणे आणि नवीन देखरेख करणायांना प्रशिक्षण देणे यासाठी स्वत:ला समर्पित करुन कार्य करतात.

> माझ्या मुला, ख्रिस्त येशूच्या ठायी असलेल्या कृपेत बलवान होत जा. ज्या गोष्टी तू पुष्कळ साक्षीदारांसमक्ष माझ्यापासून ऐकल्या त्या इतरांना शिकविण्यास योग्य अशा विश्वासू माणसांना सोपवून दे (2 तीमथ्य 2:1-2).

प्रत्येक गावामध्ये वडीलांची नेमणूक करणे अगत्याचे आहे.

> मी तुला क्रेतात ह्यासाठी ठेवून आलो की, ते अपुया राहिलेल्या गोष्टींची व्यवस्था करावी आणि मी तुला आज्ञा केल्याप्रमाणे तू प्रत्येक नगरात वडील नेमावे...देवाचा कारभारी...(तीत 1:5-7).

देखरेख करणारे आणि त्यांचे मदतनीस, वडीलजन हयांनी काही विशेष गोष्टी करणे आवश्यक आहे. 1 तीमथ्य 3, तीत 1,

> कोणी अध्यक्षाचे काम करु पाहतो तर तो चांगल्या कामाची आकांक्षा धरितो, हे वचन विश्वसनीय आहे. अध्यक्ष अदूष्य...असा असावा...त्याची निंदा होऊ नये व त्याने सैतानाच्या पाशात सापडू नये म्हणून त्याच्याविषयी बाहेरच्या लोकांनीही चांगली साक्ष दिलेली असावा...तसेच सेवकानेही गंभीर असावे... त्यांचीही अगोदर पारख व्हावी आणि अदूष्य ठरल्यास त्यांनी सेवकपण करावे (1 तीमथ्य 3:1-10)
>
> प्रत्येक नगरात वडील नेमावे. ज्याला नेमावयाचे तो अदूष्य...असावा...अध्यक्ष हा देवाचा कारभारी आहे म्हणून तो अदूष्य असला पाहिजे...त्याने सुशिक्षणाने बोध करावयास व उलट बोलणायांना कुंठित करावयासही समर्थ व्हावे (तीत 1:5-9).

ख्रिस्ती सहभागितेने शक्य होईल तेव्हा अथक परिश्रम करणाया देखरेख ठेवणायांना पगार दिला पाहिजे.

> जे वडील चांगल्या प्रकारे आपला अधिकार चालवितात, विशेषकरुन जे उपदेश व शिक्षण ह्या बाबतीत श्रम घेतात ते दुप्पट सन्मानास योग्य गणले जावे. कारण शास्त्र म्हणते, ''बैल मळणी करीत असता त्याला मुसके बांधू नको'' आणि ''कामकूयाला आपली मजुरी मिळणे योग्य आहे'' (1 तीमथ्य 5:17-19).

पाप करणाया देखरेख करणाया वडीलांची सर्वांसमक्ष कानउघाडणी करा.

> दोन किंवा तीन साक्षीदार असल्यावचून कोणत्याही वडिलांवरील आरोप स्वीकारू नका. बाकीच्यांना भय पडावे म्हणून पाप करणायांचा सर्वांसमक्ष निषेध कर (1 तीमथ्य 5:19-20.)

**कृपा करुन पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.**

- नव्या देखरेख करणायांना त्यांच्या कामसाठी कशा प्रकारे प्रशिक्षण दिले जाते?
- पूर्ण वेळ देखरेख करणारे वडील होण्यासाठीच्या काही आवश्यक गोष्टी कोणत्या आहेत?

## 7. ख्रिस्ती लोकांना लिहिलेल्या पत्रांमध्ये

सगळयाच अनुयायांनी इतरांना शिकवणारे वडील होऊ नये, कारण वडील हे येशूच्या अनुयायांसाठी आदर्श उदाहरण असे असले पाहिजेत.

> माझ्या बंधूंनो, तुम्ही पुष्कळ जण शिक्षक होऊ नका, कारण आपल्याला अधिक दंड होईल हे तुम्हांस माहीत आहे. कारण आपण सगळेच पुष्कळ चुका करितो (याकोब 3:1-2),

वडील आजाूयांसाठी प्रार्थना करतात.

> तुम्हांपैकी कोणी दुखणाईत आहे काय? त्याने मंडळीच्या वडिलांना बोलवावे आणि त्यांनी प्रभूच्या नावाने त्याला तेल लावावे व त्याच्यावर ओणवून प्रार्थना करावी. विश्वासाची प्रार्थना दुखणाईतास वाचवील आणि प्रभू त्याला उठवील आणि त्याने पापे केली असली तर त्याला क्षमा होईल. तेव्हा तुम्ही निरोगी व्हावे म्हणून आपली पातके एकमेकांजवळ काबूल करुन एकमेकांठी प्रार्थना करा. नीतिमानाची प्रार्थना कार्य करण्यात फार प्रबळ असते (याकोब 5:14-16)

वडिलांनी मंडळीसमोरील आदर्श म्हणून स्वेच्छेने कार्य करावे, द्रव्यलोभाने ते करु नये.

> तुम्हांतील वडिलांना जो मी सोबतीचा वडील, ख्रिस्ताच्या दुखांचा साक्षी व प्रगट होणाया गौरवाचा वाटेकरी तो मी असाबोध करितो : तुम्हांमधील देवाच्या कळपाचे पालन करा, करावे लागते म्हणून नव्हे तर उत्सुकतेने करा, तुमच्या हाती सोपविलेल्या लोकांवर धनीपण करणारे असे नव्हे तर कळपाला कित्ते व्हा (1 पेत्र 5:1-3).

**कृपा करुन पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.**

- वडिलांची काही कर्तव्ये सांगा.
- वडील म्हणून काम करताना योग्य दृष्टीकोन कोणता असावा?

### व्यावहारिक सल्ला

बहुतेक मंडळयांमध्ये नवीन वडील हा प्रौढ मनुष्य असावा त्याचे घर-कुटुंबिय असावेत. त्यांचे पुढारीपण तो करीत असला पाहिजे. मंडळी किंवा गटाची देखभाल-देखरेख करणे हे स्वत:च्या कुटुंबाची काळजी घेण्यासारखेच आहे. अविवाहित तरुण पुरुषांना साधारणपणे आदर-मानसन्मान दिला जात नाही आणि इतरांची काळजी कशी घ्यावी हेही त्यांना माहीत नसते.

नवीन विश्वासणाऱ्यांच्या नव्या मंडळीत किंवा गटात बरेचदा नवीन विश्वासणारा हाच उत्तम वडील असतो कारण तोच त्यांना चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतो आणि तेही त्याचा आदर करतील. तथापि, नवीन विश्वासणाऱ्याला वडील ही उपाधी देऊ नये. त्याऐवजी, नवीन विश्वासणाऱ्याला ''तात्पुरते वडील'' किंवा ''उमेदवार वडील'' असे संबोधण्यात यावे. तो स्वत:ची योग्यता सिद्ध करीत नाही आणि विश्वासणाऱ्यांचा त्यांच्यावर विश्वास बसत नाही तोवर त्याला वडील म्हणू नये.

प्रत्येक तात्पुरत्या वडीलांना मार्गदर्शन करणारा एक प्रशिक्षक हवा. प्रशिक्षक हा अधिक अनुभव असलेला दुसरा वडीलच असतो. प्रशक्षिकाने उमेदवारवडीलांची नियमितपणे भेट घेऊन पुढील गोष्टी कराव्यात.

- त्याच्या मंडळीची किंवा गटाची सध्याची गरज काय आहे हे समजावे याकरीता त्याचा अहवाल ऐका.
- त्याला त्याच्या मंडळीला किंवा गटाला कशी मदत करता येईल याची योजना आखण्यास मदत करा.
- त्याला पवित्र शास्त्रातून शिक्षण द्या.
- त्याच्या मंडळीच्या अथवा गटाच्या सध्याच्या गरजा पूर्ण होण्यास मदत होईल असा पाठ त्याला अभ्यास करण्यास द्या.
- त्याने पूर्ण केलेले पाठ तपासा किंवा त्यावर चर्चा करा.
- उमेदवार वडीलांसाठी आणि त्यांच्या मंडळीसाठी प्रार्थना करा.
- समस्यांवर जास्त वेळ खर्च करू नका. नवीन मंडळीचा विकास होण्यास साहाय्य होईल अशा नव्या कार्यक्रमांवर किंवा सेवाकार्यांवर विचार करा.
- उमेदवार वडीलांनी शिकणे आवश्यक असणारी नवीन कौशल्ये एकत्रितपणे शिका.

उमेदवार वडीलांनी त्यांचे प्रशिक्षण सुरु करुन मंडळीची वा गटाची देखरेख करण्यास आरंभ केल्यावर लागलीच त्यांना अन्य उमेदवारांना प्रशिक्षण देता येईल. प्रशिक्षक वडीलांना सल्ला आणि इतर साहित्य देईल त्याचा उपयोग त्याला उमेदवारांना शिकवण्यास होईल. अशा प्रकारे, प्रत्येक उमेदवार वडीलांना अन्य उमेदवार वडीलांना शिक्षण देऊन अनेक नव्या मंडळया व गट सुरु करता येतील. "Train & Multiply" हा अभ्यासक्रम तुम्हांला यासाठी उपयुक्त ठरेल. तुमच्या भाषेतील अभ्यासक्रमाविषयी जाणून घेण्यासाठी *pwr@trained multiply.com* येथे संपर्क साधा.

वडीलांना सुमारे वर्षभर प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांची मंडळी किंवा माता मंडळी त्यांच्यावर आपले हात ठेवून त्यांना देखरेख करणारे, पाळक वा वडील असे म्हणू शकते. या कामगिरी सोपविण्यालाच दीक्षा देणे असेही म्हणतात. याला तुम्ही दीक्षा देणे असे म्हणणर असाल तर नव्या करारात सांगितलेल्या आवश्यक गोष्टीची च तुम्ही अपेक्षा करीत आहात याची खातरजमा करुन घ्या. मानवी आवश्यक गोष्टी यामध्ये घालणे म्हणजे नव्या मंडळीच्या विकासाला खिळ घालणे आणि त्यांना ख्रिस्ताचे आज्ञापालन करण्यापासून दूर ठेवणे होय.

बहुतेक लोकांनी मंडळी सुरु करावी, तिच्यावर देखरेख करावी आणि आणखी मंडळी सुरु करण्यास मदत करावी आणि मग पवित्र शास्त्र शाळेत जावे.

समजा मंडळीची पुरेशी वाढ झाली आणि वडीलांना पगार देण्याइतपत तिची आर्थिक स्थिती भक्कम झाली तर मग सदस्यांना स्वत:कडून दशांश व अर्पणे-दाने घेता येतील आणि वडीलांचा पगार देता येईल. पगार मिळणाऱ्या वडीलांनी पूर्ण वेळ वडिल म्हणून सेवा करावी-त्याने अन्य व्यवस्था अथवा नोकरी करु नये.

## देखरेख ठेवणाऱ्यांना असणारे धोके

केव्हा केव्हा ख्रिस्ति सहभागितेतील देखरेख करणाऱ्या वडीलांकडूनही चुका होतात. मोह परीक्षेवर मात करण्यासाठी त्यांनी सातत्याने देवाकडे साहाय्य मागितले पाहिजे. वडीलांच्या हातून होणारी काही नेहमीचे पातके पुढीलप्रमाणे आहेत.

1. वडील कदाचित् शिष्यांना स्वत:च्या मागे नेतील.

   कळपाची दयामाया न करणारे क्रूर लांडगे तुम्हामध्ये शिरतील. तुम्हांपैकी काही माणसे उठून शिष्यांना आपल्यामागे ओढून घेण्यासाठी विपरीत गोष्टी बोलतील. (प्रे.कृ. 20:29-30).

2. वडीलांना प्रत्यक्ष पाप करतांना पकडले जाईल.

   दोन किंवा तीन साक्षीदार असल्यावाचून कोणत्याही वडिलावरील आरोप स्वीकारु नको. बाकीच्यांना भय पडावे म्हणून पाप करणाऱ्यांचा सर्वांसमक्ष निषेध कर. देव, ख्रिस्त येशू व निवडलेले देवदूत ह्यांच्यासमोर मी तुला निक्षून सांगतो की मनात अढी न धरिता ह्या आज्ञा पाळ, पक्षपाताने काही करु नका. उतावळीने कोणावर हात ठेवू नको आणि दुसऱ्यांच्या पापात तुझे अंग असू नये, आपणाला शुद्ध राख (1 तीमथ्य 5:19-22).

3. वडीलांना कदाचित् पैशाचा मोह होईल.

   तुम्हांमधील देवाच्या कळपाचे पालन करा, करावे लागते म्हणून नव्हे तर देवाच्या इच्छेप्रमाणे संतोषाने त्याची देखरेख करा. द्रव्यलोभाने नव्हे तर उत्सुकतेने करा (1 पेत्र 5:2).

4. वडील कदाचित् अधिक अमर्याद अधिकार स्वत:कडे घेतील

   तुमच्या हाती सोपविलेल्या लोकांवर धनीपण करणारे असे नव्हे, तर कळपाला कित्ते व्हा (1 पेत्र 5:3).

5. वडील कदाचित् स्वत:चे महत्व वाढवण्याचा प्रयत्न करतील.

   मी मंडळीला थोडेसे लिहिले परंतु तिच्यामध्ये अग्रगण्य होण्याची लालसा धरणारा दियत्रफेस हा आमचा स्वीकार करीत नाही, ह्यामुळे मी आलो तर तो जी कृत्ये करितो त्यांची आठवण देईन, तो आम्हाविरुद्ध द्वेषबुद्धीने वाष्कळ बडबड करितो, तेवढयाने त्याचे समाधान होत नाही आणि तो बंधुजनांचा स्वीकार स्वत:ही करीत नाही आणि जे त्यांचा स्वीकार करु इच्छितात त्यांनाही तो मना करीतो व मंडळीबाहेर घालवून देतो. (3 योहान 1: 9-10).

**कृपा करुन पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.**

- वडील-देखरेख करणारे या नात्याने तुम्ही कोणत्या गोष्टी करण्याचा प्रयत्न करणार नाही?
- वडील देखरेख करणाऱ्यांची वागणूक योग्य नसेल तर तुम्ही काय कराल?

## कथावृत्तांत्त पुढे सुरु

श्री. विश्वासणारे श्री प्रशिक्षकांना सांगतात, ''एखादा मेंढपाळ आपल्या मेंढरांची देखभाल करतो तशी वडील प्रभूच्या लोकांची काळजी घेतात. वडील म्हणून काम करण्यास सुरुवात करण्याकरीता मला काय करावे लागेल?''

श्री. प्रशिक्षक श्री. विश्वासणारे ह्यांना उत्तर देताता, ''ठिक आहे येथे काही प्रत्यक्ष करावयाचे काम आहे, हे काम तुम्हांला कसे करता येईल याची आपण योजना आखू या.''

## प्रात्यक्षिक कार्य

- देखरेख करणाऱ्या वडीलांच्या अंगी असाव्या अशा सर्व वैयाक्तिक पात्रतांची यादी करा आणि प्रभूला मदत करण्याची विनंती करा.
- मंडळीने करणे आवश्यक आहेत अशी सर्व कामे आणि कार्यक्रमांसाठी योजना आखा. यावर वडील म्हणून तुम्ही देखरेख ठेवणार आहात. यात पुढील गोष्टींचा समावेश असावा :

  –समस्या सोडवणे,

  –सदस्यांमध्ये आणि इतर मंडळयांशी सहभागितेचे संबंध राखणे.

–लहान लहान गटांची स्थापना करणे म्हणजे प्रत्येकाला सहभाग घेता येईल आणि एकमेकांची सेवा करता येईल.

–भगिनी मंडळया आणि नवीन गट सुरु करणे.

–नवीन मंडळया आणि गटांमधील नव्या पुढायांना प्रशिक्षण देणे,

- या पुस्तिकेतील पवित्र शास्त्रातील उतायांचा उपयोग करुन तुमच्या मंडळीला किंवा गटाला वडील–देखरेख करणायांबद्दल शिकवा.
- वडील होण्यासाठी प्रशिक्षण दिले पाहिजे असे तुमच्या मंडळीतील काही लोक निवडा.

## अनुमान

देखरेख करणारे वडीलजन ह्यांनी प्रेमाने व सूज्ञतेने अपल्या मंडळया आणि गटांची देखभाल केली तर प्रभू येशू त्या प्रत्येकाला प्रतिफळ देईल. वडील म्हणून सेवा करण्यास पाचारण झालेल्यांना देवाचा पवित्र आत्मा खास सामर्थ्य पुरवतो.

देवावर व एकमेकांवर प्रेम करणे, देवाच्या वचनाचे आज्ञापालन करणे याकरीता देखरेख करणारे वडील ह्या नात्याने तुम्हांला तुमच्या मडळीला साहाय्य करता येईल. तसेच इतरांना उमेदवार वडील म्हणून तुम्हांला प्रशिक्षण देता येईल आणि नवीन गटही सुरु करता येतील.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net